महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781 / 82 / 83
25536712 (OFF)

E-MAIL sscboardpune@gmail.com

महत्त्वाचे-

जा.क्र.पुविमं/उमा-अ/ ९६४६
पुणे ४११ ००५
दिनांक- २१/०९/२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा-पुणे, अ.नगर, सोलापूर

**विषय-व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई अंतर्गत उच्च माध्यमिक स्तरावरील NSQF अंतर्गत सुधारित अभ्यासक्रमानुसार द्विलक्षी व्यवसाय शिक्षण शैक्षणिक वर्षे २०२५-२६ पासून सुरू करणेबाबत ..**
संदर्भ- राज्य मंडळ पत्र जा.क्र.रा.मं/संशोधन/समकक्षता/३४५८ दि.१८.०८.२६

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय राज्य मंडळ पत्रानुसार संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई या कार्यालयाने ज्या कनिष्ठ महाविद्यालयास NSQF सुसंगत द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरू करण्याबाबत मान्यता दिलेली आहे त्या सर्व विद्यार्थ्यांची इ.१२ वी ची लेखी/प्रात्यक्षिक परीक्षा फेब्रु-मार्च २०२७ मध्ये होणार आहे.

NSQF सुसंगत द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाची सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना तसेच सुधारित जॉब रोल अभ्यासक्रमामध्ये झालेल्या बदलाबाबत सोबत राज्य मंडळ परिपत्रक जोडले आहे. सदरील परिपत्रकाची नोंद घेऊन परिपत्रक सूचना फलकावर लावावे. तसेच आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना संबंधित बाबत आपल्या स्तरावरून अवगत करावे .

MBRaut
(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५



e:\vandana more\vandana more\letters from aug 2026.docx

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४

**परिपत्रक क्रमांक रा.म./पापुई/संशोधन इ.१२ वी द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम/मूल्यमापन योजना/३००२ दिनांक - १७/०७/२०२६**

**विषय - व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई अंतर्गत उच्च माध्यमिक स्तरावरील NSQF अंतर्गत सुधारित अभ्यासक्रमानुसार द्विलक्षी व्यवसाय शिक्षण शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरु करणेबाबत.....**

संदर्भ- १. कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. व्हिओसी- २०२३/ प्र.क्र १४ कौशल्य-२, दिनांक २०/०६/२०२३.

२. कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. व्हिओसी- २०२३ प्र.क्र.१४/कौशल्य-२, दिनांक २४/११/२०२३.

३. कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. व्हिओसी- २०२३/प्र.क्र.२५/कौशल्य-२, दिनांक १४/०३/२०२४.

४. कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. व्हिओसी- २०२३/प्र.क्र.१४/कौशल्य-२, दिनांक ०६/०६/२०२४.

५. कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. व्हिओसी- २०२३/प्र.क्र.१४/कौशल्य-२, दिनांक ३०/०५/२०२५.

६. संचालनालयाचे पत्र क्र.५/व्हिओसी/द्विलक्षी/२०२५/२५२, दिनांक ०८/०९/२०२५.

७. संचालनालयाचे पत्र क्र.५/व्हिओसी/द्विलक्षी/२०२६/०४, दिनांक २२/०१/२०२६.

८. संचालनालयाचे पत्र क्र.५/व्हिओसी/द्विलक्षी/२०२६/४०, दिनांक ०९/०२/२०२६.

९. संचालनालयाचे पत्र क्र.५ व्हीओसी /द्विलक्षी /२०२६ /१८६ दिनांक १२/०६/२०२६.

राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक / प्राचार्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई अंतर्गत राज्यात NSQF सुसंगत द्विलक्षी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरु झालेली आहे. या संदर्भातील कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,संदर्भ क्र. ५ शासन निर्णय दिनांक ३० मे २०२५ रोजी निर्गमित करण्यात आले होते. सदर निर्णयानंतर संचालनालयाचे संदर्भ क्र. ७ च्या पत्रान्वये ज्या कायम विना-अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांना २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात मान्यता देण्यात आली आहे, अशा सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना हे विषय सुरु करण्याबाबत आदेश निर्गमित झाले आहेत.

तसेच संदर्भिय पत्र क्र. ०८ व ०९ च्या पत्रान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे कडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इ. ११ वी व शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून इ. १२ वी चा NSQF सुसंगत सुधारित अभ्यासक्रम, जॉबरोल व उद्योजकीय कौशल्य(Employability Skill) वर आधारित सुधारित पाठ्यपुस्तके प्राप्त झाली आहेत. त्याच बरोबर राज्य मंडळाने तयार केलेले मूल्यमापन आराखडे, प्रात्यक्षिक गुणदान योजना व घटकनिहाय गुण विभागणी या सर्व घटकांना व्यवसाय शिक्षण संचालनालयाने संदर्भ क्र.०९ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. इयत्ता १२ वीच्या नवीन सुधारीत अभ्यासक्रमाची नावे व नवीन विषय कोड क्रमांक याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | नवीन विषय कोड क्र. | गट क्र. | नवीन सुधारीत अभ्यासक्रमाचे नाव | इयत्ता ११ वी साठी सुधारित अभ्यासक्रम अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष | इयत्ता १२ वी साठी सुधारित अभ्यासक्रम अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | AA | गट- १ इलेक्ट्रिकल मेंटेनन्स | Field Technician-Wireman Control Panel **(Paper 1)** Ref. Id. ELE / QP 7302) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| २ | AB | | Lineman Distribution **(Paper 2)** (Ref. Id. PSS/ QP-0102) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| ३ | BA | गट- २ इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी | Field Technician-Computing and Peripherals **(Paper 1)** (Ref. Id. ELE / QP 4601) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| ४ | BB | | Field Technician Air Conditioner **(Paper 2)**(Ref. Id – PSS /QP 3102) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| ५ | CA | गट- ३ स्कूटर & मोटार सायकल सर्व्हिसिंग | Auto Service Technician L4 **(Paper 1)** ( Ref.Id.ASC / QP 1402) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| ६ | CB | | Auto Service Technician (Two And Three Wheeler **(Paper 2)** (Ref Id. ASC/QP 1411) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| ७ | BA | गट- ४ कॉम्पुटर सायन्स | Field Technician-Computing and Peripherals **(Paper 1)** (Ref Id. ELE/QP4601) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| ८ | DB | | Junior Software Developer **(Paper 2)** (Ref Id. SSC/QP 508) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| ९ | AC | गट- ५ जनरल सिव्हील इंजिनिअरिंग | General Mason **(Paper 1)** (Ref Id. CON/QP 0103) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १० | AD | | Construction Painter and Decorator **(Paper 2)** (Ref Id. ELE/QP-0503) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | BC | गट -६ मेकॅनिकल मेंटेनन्स | Plumber General (Paper 1) (Ref Id. PSC/QP-Q0104) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १२ | BD | | Agriculture Machinery Operator (Paper 2) (Ref Id. PSC/QP-Q1103) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १३ | CC | गट- ७ बँकिंग, मार्केटिंग & सेल्समनशीप | Business Correspondent and Business Facilitator (Paper 1) (Ref Id. BSC/QP-Q8401) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १४ | CD | | Distributor Salesman (Paper 2) (Ref Id. RAS/QP-Q0604 ) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १५ | DC | गट- ८ ॲनिमल सायन्स & डेअरी | Dairy Farmer / Dairy Entrepreneur (Paper 1) (Ref Id. AGR/QP 4101) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १६ | DD | | Small Poultry Farmer (Paper 2) (Ref Id. AGR/QP 4306) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १७ | AE | गट- ९ क्रॉप सायन्स | Organic Grower (Paper 1) (Ref Id. AGR/QP-1201) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १८ | AF | | Irrigation Service Technician (Paper 2) (Ref Id. AGR/Q-Q1104) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| १९ | BE | गट -१० हॉर्टीकल्चर | Floriculturist (Open Cultivation) (Paper 1)(Ref Id. AGR/QP-0701) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |
| २० | BF | | Gardener (Paper 2) (Ref Id. AGR/QP-0801) | २०२५-२६ पासून | २०२६-२७ पासून |

उपरोक्त **AA, AB, BA, BB, CA, CB, BA, DB, AC, AD, BC, BD, CC, CD, DC, DD, AE, AF, BE व BF** या विषयांची उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२७ सुधारित अभ्यासक्रम व मूल्यमापन आराखडयाप्रमाणे आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे परिपत्रक क्रमांक रा.म./पापुअ/पापुई/संशोधन/४२४१ दिनांक १९ ऑगस्ट २०१९ नुसार व शासन शुद्धीपत्रक क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१२१/एसडी-०४ दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ नुसार इ.११ वी ची सुधारित विषययोजना, मूल्यमापन योजना व तासिका तसेच इतर बाबी लागू राहतील याची नोंद घ्यावी.

तसेच सदर विषयाचे अभ्यासक्रम पंडित सुंदरलाल शर्मा सेन्ट्रल इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन(PSSCIVE) भोपाल या संस्थेचे मान्यताप्राप्त असल्याने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी त्यास मान्यता दिली आहे. **सदर नवीन विषयांना मंडळाच्या नियमानुसार मंडळाची मान्यता उच्च माध्यमिक विद्यालयांनी घेणे आवश्यक आहे.** सदर अभ्यासक्रम PSSCIVE संस्थेच्या www.psscive.nic.in या संकेत स्थळावर व मंडळाच्या www.mahahsscboard.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर परिपत्रक संबधित विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी यांचे निदर्शनास आणून विद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळास सादर करावा. इयत्ता १२वीचा NSQF सुसंगत

दिलेली सुधारित व्यावसायिक विषयांचा अभ्यासक्रम/मौखिक तसेच मूल्यमापन आराखडे, प्रात्यक्षिक गुणदान योजना, घटकनिहाय गुणविभागणी इ. मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे -०४

ठिकाण -पुणे
दिनांक - [illegible]

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ), शिक्षण संचालनालय, पुणे .
२) मा संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई.
३) सर्व विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व विभाग.
५) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद.
६) शिक्षण निरीक्षक, उत्तर/दक्षिण/पश्चिम,मुंबई.
७) गणकयंत्र विभाग, परीक्षा शाखा व सर्व संबधित शाखा,राज्य मंडळ,पुणे.

प्रत माहितीसाठी सादर:

१) मा. सहसचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१
३) मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ,कुमठेकर मार्ग ,पुणे- ३०
४) मा. संचालक ,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,(बालभारती), सेनापती बापट मार्ग,पुणे -०४